# ॥ सायंकाळची शोभा ॥

भा. रा. तांबे (१८७४-१९४१)

पिवळें तांबुस ऊन कोवळें पसरे चौफेर
ओढा नेई सोनें वाटे वाहुनिया दूर.
झाडांनीं किति मुकुट घातले डोकिस सोनेरी
कुरणावर शेतांत पसरला गुलाल चौफेरी !

हिरवें हिरवेंगार शेत हें सुंदर साळीचें
झोके घेतें कसें चहुंकडे हिरवे गालीचे !
सोनेरी मखमली रुपेरी पंख कितीकांचे
रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे.

अशीं अचल फुलपाखरें फुलें साळिस जणुं फुलती
साळीवर झोपलीं जणूं का पाळण्यांत झुलती.
झुळकन् सुळकन् इकडुन तिकडे किति दुसरीं उडती !
हिरें माणकें पांचू फुटुनी पंखचि गरगरती !

पहा पांखरें चरोनि होती झाडावर गोळा.
कुठें बुडाला पलीकडिल तो सोन्याचा गोळा ?